मैत्री नादलुब्धांची!

वीसेक वर्षांपूर्वी जुन्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिका जमवणाऱ्यांचं मित्रमंडळ सुरू करावं असं ठरवलं त्यावेळी एवढया मोठया संख्येनं संग्राहक भेटतील, मित्र होतील व विशेष म्हणजे बहुतेक सगळेजण पुरूषच असतील असं मुळीच वाटलं नव्हतं. त्याची सुरूवात फार वेगळी व अनोखी अशी झाली होती. ऑस्ट्रेलियातले मायकल किन्नर नावाचे गृहस्थ भारतीय ध्वनिमुद्रिकांचा ज्ञानकोष बनवत आहेत असं एका मराठी वर्तमानपत्रात वाचलं होतं. तो धागा पकडून त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. कारण या विषयात मला गोडी होतीच. लहानपणी शाळेत असल्यापासूनच जुन्या फोनोच्या प्लेटी व ग्रामोफोन मशीन्स जमवायचा नाद लागला होता. पुण्यात तशी फार मंडळी नव्हती. पण मुंबईत नोकरीसाठी आल्यानंतर हळूहळू अनेक संग्राहकांची माहिती मिळू लागली. त्यांना एकत्र आणावं व एखादं मित्रमंडळ बनवावं असं ठरवलं. त्यातून मायकलशी पत्रव्यवहार सुरू झाल्यावर या छंदाच्या मला माहित नसलेल्या अनेक बाबी समजल्या. गाणी ऐकणं व तबकडयांच्या नुसत्या साठवणींच्याही पलिकडं संशोधनाचं अफाट काम आहे याची जाणीव झाली. तो जमाना आजच्यासारखा ई-मेल, फेस बुक्स व मोबाइल फोन्सचा नव्हता. त्यामुळं पारंपारिक टपालानं पत्रव्यवहार, क्वचित फोनवर बोलणं होई. १९९० च्या सुमारास ते मुंबईत माझ्या घरी महिनाभर मुक्कामाला होते. पहिल्या दशकातल्या (१८९९-१९०८) भारतीय ध्वनिमुद्रिकांच्या कोषाचं काम पुरं होत आलं होतं. पण त्याच्या पुढचे भाग व 'रेकॉर्ड लेबल्स ऑफ इंडिया' या पुस्तकांची तयारी करण्याकरिता ही भेट होती. प्रत्यक्ष भेटीमुळे या विषयावर अधिक तपशीलवार बोलता आलं व मैत्रीचे धागे कसे जुळत गेले ते समजलं पण नाही. त्यातूनच आमच्या 'सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स' ची कल्पना पुढं आली. त्याची ध्येयधोरणं व उद्दिष्ट ठरवणं, सोसायटीची घटना तयार करणं, मुंबईतल्या संग्राहकांशी प्राथमिक बोलणी करणं या सगळयात त्यांनी घरचंच कार्य असल्यासारखा ऊत्साह दाखवला. सोसायटीचं एक मासिक / मुखपत्र असावं हे त्यांनीच आमच्या गळी उतरवलं. त्यात लेखनाचा मोठा वाटा उचलायची तयारी दाखवली व ते परत मायदेशी निघूनपण गेले. ही मैत्री रूजेल व त्यातून काही काम उभं राहील असं त्यावेळी तरी वाटलं नव्हतं.

मायकल यांनी मांडलेली कल्पना अनेकांनी हसण्यावारी नेली. संग्राहक हा स्वभावतःच स्वार्थी, आप्पलपोटा व संकुचित विचारांचा असतो की काय असंच माझं मत व्हायला लागलं होतं. त्यातून चित्रपटसंगीताचे संग्राहक ही पुन्हा स्वतःला इतरांहून वेगळी व शहाणी समजणारी जमात! त्यांच्यातल्या तीव्र स्पर्धा, हेवेदावे, मत्सर व आर्थिक व्यवहारांच्या कहाण्या कानांवर येत होत्या. तरीही चिकाटीनं त्यांना भेटणं चालूच ठेवलं. त्याकाळी दादर भागात सिनेसंगीताच्या ध्वनिमुद्रिकांचे दोन मोठे संग्राहक होते. मोठमोठया गायक गायिका व संगीतकारांबरोबर त्यांची ऊठबस असल्याचा ते दावा करीत. दोघंही पेपरात लेख वगैरे लिहून, त्यात फारश्या ऐकायला न मिळणाऱ्या गाण्यांच्या याद्या छापवून आणून स्वतःच्या संग्रहाची भलाभण करीत असत. कानसेनांचं लक्ष वेधून घेऊन दुर्मिळ (?) गाण्यांवरून त्यांना आपल्या लिखाणातून खिजवत असत. एकाचं रस्त्याला लागूनच सिगारेट, तंबाखू विक्रीचं दुकान होतं व आतल्या भागात रेकॉर्डसचा साठा. शौकिनांना चढया भावानं मुद्रणं करून मिळत. त्यानं तासभर

मला रस्त्यावरच उभं करून एकीकडं गि-हाईकं सांभाळत बोधामृत पाजलं. पण शेवटपर्यंत आत नेऊन संग्रह दाखवला नाही. एकत्र येण्याविषयी विचारता 'अश्या प्रकारचं मित्रमंडळ होणं अशक्य आहे' हे मला समजावयाचा प्रयत्न केला. दुसरे मोठे संग्राहक बँकेतले बडे अधिकारी. स्वतःच्या संग्रहाचे जरा ज्यादाच अभिमानी! 'या छंदात कुणी कुणाचा नसतो. दुस-याला मिळू नयेत याकरिता एखाद्या गाण्याच्या सगळया रेकॉर्डस खरेदी करणारी मंडळी यात आहेत. ज्यानं त्यानं आपला मार्ग काढायचा असतो. एकत्र असायला व तसा प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. फारसं काही घडेल या आशेवर मात्र राहू नका' म्हणाले. निघता निघता त्यांनी काही संग्राहकांची नावं व पत्ते मात्र दिले. अश्या नाऊमेद करणा-या वातावरणात मी १९९० साली एक लेख लिहिला, 'महाराष्ट्र टाइम्स' कडं पाठवला व विसरूनही गेलो. एका रविवारच्या पुरवणीत 'जुन्या ध्वनिमुद्रिकांचे विश्व' या शीर्षकासह तो छापूनही आला. त्यालाही बरेच दिवस लोटले. एकदा शनिवारी जेवण आटोपून काही वाचत बसलो होतो. तो दारावरची बेल वाजली. उघडून बघतो तर समोर एक प्रौढ गृहस्थ उभे. हातात पिशवी, डोळयांवर चष्मा व डोक्यावर टोपी. उन्हात तापून आलेले दिसत होते. 'नमस्कार. मी प्रभाकर दातार. रिझर्व बँकेत कामाला असतो. आपणच सुरेश चांदवणकर का?' असं म्हणाले. घरात येऊन जरा विसावल्यावर त्यांनी पिशवीतून म. टा. चा अंक काढला. 'तुमचा लेख वाचून टाइम्सच्या ऑफिसात जाऊन पत्ता घेतला. तिथं तुमचा फोन नंबर नाही मिळाला. (फोन नव्हताच तेव्हां. या छंदामुळंच नंतर घ्यावा लागला). माफ करा हं. आज हाफ डे असल्यानं न कळवताच आलो. म्हटलं भेटलात तर ठीकच. माझ्याकडं पण थोडयाफार रेकॉर्डस आहेत. तुमचा लेख वाचून भेटावं असं वाटलं. म्हणून आलो'. कुर्ल्याचे प्रभाकर दातार व त्यांचा मोठा संग्रह याच्याविषयी खूप ऐकून होतो. पण त्यांच्या भेटीचा हा असा योग येईल असं मात्र वाटलं नव्हतं. दुपारी आलेले दातार रात्री आठ वाजता गेले. माझ्या संग्रहातल्या रेकॉर्डसची यादी बघून खुष झाले. एकेका गाण्यामागच्या आठवणी व किस्से ऐकता ऐकता वेळ कसा गेला हे समजलं नाही. चहा खाणं कधी झालं त्याचंही भान राहिलं नाही. हे दोघं इतका वेळ कसल्या गप्पा मारताहेत हे बायकोला व छोटया मुलांना कळेना. संग्राहकांचं मित्रमंडळ असावं यावर सहमतीच नव्हे तर सक्रिय पाठिंबा पण देऊ केला. रिजर्व बँकेतलेच माझे संग्राहक मित्र राम पागे, श्रीराम सुखटणकर व मी गेली काही वर्षे लोकांना फुकट गाणी ऐकवण्याचे कार्यक्रम करतो. लोकांना ते फार आवडतात असं म्हणाले. कुर्ल्याला येण्याचं निमत्रण देऊन व मला हुरूप देऊन दातार गेले.

असेच काही दिवस गेले. वर्तमानपत्रांतून अशा उपक्रमाविषयी माहिती दिली. आवाहन केलं. काही जणांनी प्रतिसाद दिला. एक पत्ता मिळाला. गावदेवी पोलिस स्टेशनसमोर 'तुलसी व्हिला' नावाची तीन मजली इमारत आहे. तिथं नारायणभाई मुलाणी नावाचे संग्राहक राहतात असं समजल्यानं त्यांना भेटायला गेलो. इंपोर्ट एक्सपोर्ट व फॉरवर्डिंग एजन्सीचा त्यांचा पिढीजाद व्यवसाय. काकांचं ग्रामोफोनस व रेकॉर्डसचं दुकान. त्यामुळं अगदी लहानपणापासूनच ध्वनिमुद्रिकांचा ध्यास लागला. छोटया नारायणाला आवडतात म्हणून दुकानातून मुद्दाम रेकॉर्डस आणीत असत. पुढं त्यांचा वैयक्तिक संग्रह वाढतच गेला. १९३२ ते ५० सालापर्यंतचं बोलपटसंगीत, जुनं शास्त्रीय संगीत व गुजराथी गाण्यांचा मोठा संग्रह. नारायणभाईंना मित्रमंडळाची ही कल्पना फार पसंत पडली. गाणी

ऐकायचा पहिला कार्यक्रम माझ्याच घरी करायचा म्हणाले व तो सुद्धा 'प्रभात फिल्म कंपनी'च्या चित्रपटातल्या गाण्यांच्या रेकॉर्डस ऐकण्याचा. अन खरोखरीच लवकरच तसा योग जुळून पण आला. मुलाणींच्याच घरात कानसेन जमले. 'प्रभात' काळातली गाणी ऐकण्याकरिता 'प्रभात'शीच संबंधित श्री. बाबूराव पै, दादा दामले, सिने सोसायटीचे अलीभाई, विख्यात सतारवादक पं. अरविंद पारिख, पत्रकार हेमंत देसाई, प्रभाकर दातार व वीसेक रसिक मंडळी जमली. 'सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स' ची कल्पना मी मांडली. तृप्त कानांनी कानसेन घरोघरी परतले. या उपक्रमाची बातमी पेपरात छापून आली. सगळीकडं विखुरलेल्या जुन्या गाण्यांच्या भुकेल्या श्रोत्यांकडून अशा कार्यक्रमांची मग मागणी होऊ लागली. झवेरी बाजारात प्रदीप आचार्यांच्या घरात 'ओ. पी. नय्यरां'च्या संगीतानं नटलेल्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकविण्यात आल्या. काही महिन्यांनी कुर्ल्याला प्रभाकर दातारांच्या घरातच 'जुनी मराठी बोलपटगीतं' ऐकवण्याचा बेत ठरला. तशी अगदी छोटी बातमी 'आजचे कार्यक्रम' सदरात पेपरात छापवून आणली. परिणामी, कार्यक्रम सुरू व्हायच्या अगोदरच दातारांच्या 'विनायक बाग' परिसरातल्या सगळया खोल्या, व्हरांडे, जिने व अंगण श्रोत्यांनी भरून गेलं. लांबच्या एका खोलीत फोनोवर एकामागोमाग गाणी लागत होती व कानांत प्राण आणून रसिक श्रोते ती दुर्मिळ गाणी सर्व अडचणी सोसून उभं राहून ऐकत होते. हे फार विलक्षण होतं.

त्यापासून योग्य तो बोध घेऊन मग भाडयाने मोठा हॉल घेऊन असे कार्यक्रम ऐकवू लागलो. त्यातून अनेक नवीन संग्राहक व रसिक मित्र या कामाशी जोडले गेले. कुलाब्यातले शरद दळवी, धोबीतलावापासचे डॉ. अरूण आठल्ये, गिरगावातले मोरेश्वर पटवर्धन, वाळकेश्वरचे राम पागे व डॉ. प्रकाश जोशी, केंम्पस कॉर्नरचे कृष्णराज मर्चंट व अमीन सयानी, वरळीच्या नजमाजी व शब्बीरभाई लॉयनमून, दादर चे भालचंद्र मेहेर, अमरेंद्र धनेश्वर व शरद देसाई, वांद्रयाचे अमिया चक्रवर्ती व नरेश फर्नांडिस, कांदिवलीचे विजय जोशी, बोरिवलीचे शाम सामंत, कुर्ल्याचे नावेलकर, चेंबूरचे अशोक ठाकूरदेसाई, ठाण्याचे चोरगे, करंदीकर व आठल्ये, डोंबिवलीचे जयरामन व टेंबे कुटुंबिय. या सर्वांशी ओळख झाली व परिचयाचं लवकरच गाढ मैत्रीत रूपांतर झालं. ही मंडळी त्यांच्या आवडीच्या विषयावरच्या गायक, गायिका व संगीतकारांची गाणी गोळा करत होती. ती पण मग कार्यक्रम तयार करून सादर करू लागली. बोलपट संगीत, नाटयसंगीत, शास्त्रीय संगीतातले वेगवेगळे विषय व गाणी या निमित्तानं एकत्रित होऊ लागली. केवळ ध्वनिमुद्रित गाणी ऐकण्याकरिता मोठया संख्येनं रसिक जमतात व शांतपणे त्याचा आनंद घेतात ही खरोखरीच नवलाईची गोष्ट होती. १९९२ ते २००२ या दहा वर्षात शंभराहून अधिक श्रवणसत्रं आयोजित करण्यात आली. त्यांना रसिकांचा ऊदंड प्रतिसाद मिळाला. गिरगावातल्या साहित्य संघ मंदिरात चवथ्या मजल्यावरच्या पुरंदरे सभागृहात पुष्कळसे कार्यक्रम होत असत. कार्यक्रमानंतर संस्थेला देणगी द्यावी असं आवाहन होत असे व रसिक मंडळी त्यालाही रांग लावून प्रतिसाद देत असत. अश्याच एका प्रसंगी मी देणगीच्या पावत्या फाडत होतो. मान वर करून बघायलाही फुरसत नव्हती. शंभराची नोट पुढं आली. पावतीवर लिहिण्यासाठी नाव विचारलं तर उत्तर आलं, 'दत्ता डावजेकर'. चमकून वर बघितलं तर पंचाहत्तरीतले डावजेकर तरूणाच्या उत्साहानं व हस-या चेह-यानं पुढयात ऊभे. ऊठून पटकन वाकून नमस्कार केला. त्यावर 'अहो हे

काय करता. मी इथंच पलिकडं राहतो व तुमच्या कार्यक्रमांना येत असतो. तुमच्या या अनोख्या व महत्वाच्या उपक्रमाला आमचाही हातभार लागू द्या की' असं म्हणाले. लवकरच त्यांच्या घरी जाऊन गप्पा मारण्याचा योग आला. त्यांनी काही रेकॉर्डस व इलेक्ट्रॉनिक ऊपकरणं पण दिली. मग त्यांच्याच संगीतावर आधारित 'डावजेकरांचं संगीत' हा कार्यक्रम आम्ही सादर केला. त्या दिवशी लिफ्ट बंद होती. तर आमच्याही अगोदर जिने चढून वर आले. म्हणाले, 'अहो त्यात काय मोठंसं. दोन्ही हातात पाण्यानं भरलेल्या बादल्या घेऊन चार चार मजले चढून जायचा सराव आम्हां गिरगांवकरांना आहे म्हटलं'. त्यांचे परममित्र गजाननराव वाटवे यांच्या ध्वनिमुद्रिकांवरील कार्यक्रमात ते मनापासून सामील झाले व दोघांच्या तारूण्यातल्या आठवणी जागवल्या. वाटवे यांनी 'पार्श्वगायक' या नात्यानं बोलपटांसाठी गायिलेल्या काही गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका आमच्या संग्रहात होत्या. त्यावर त्यांना बोलतं करावं व एक ऐतिहासिक दस्तावेज तयार करावा या हेतूनं माझे प्रयत्न चालू होते. पण ते काही त्याला दाद देत नव्हते. कारण हा विषय त्यांच्या आवडीचा नव्हता असं मागाहून समजलं. शेवटी माझी पीडा टाळण्याकरिता अतिशय जाचक वाटणा-या अटी व मानधनाची मोठी रक्कम त्यांनी मागितली. ते सगळं मान्य केल्यावर मात्र ते आले. माझ्या घरीच ऊतरले. त्यांची समजूत होती की फोनोभोवती काही गाण्यातले किडे कोंडाळं करून बसतील. प्लेटी वाजवतील व गाण्याचं पांडित्यपूर्ण विश्लेषण करतील. पण साहित्य संघ मंदिराच्या पुरंदरे सभागृहात ऊसळलेली गर्दी पाहून ते हरखून गेले. हे असं होणारच याचा मला अंदाज असल्यानं मी अगोदरच खुर्च्या काढून टाकून भारतीय बैठक घालून घेतली होती. तो कार्यक्रम अपेक्षेबाहेर रंगला. स्वतः वाटवेही अतिशय भारावून गेले होते. आमच्या उपक्रमाचं तोंड भरून कौतुक करूनच केवळ थांबले नाहीत तर आम्ही कबूल केलेलं सगळं मानधन सोसायटीला देणगी रूपानं परत केलं. तुमच्यात पुन्हा पुन्हा यायला आवडेल म्हणाले. पुढं पुण्याला गेलो की आवर्जून भेटायला बोलावीत असत. अश्याच कार्यक्रमांतून बाबूजी सुधीर फडके, वासुदेव (स्नेहल) भाटकर, प्रभाकर जठार, डॉ. शरश्चंद्र गोखले, जी. बी. नाडकर्णी, कैलासनाथ जैस्वाल व वि. दे. अंभईकर हया ऊपक्रमाशी जोडले गेले व त्यांनी अनेक कार्यक्रमांत भाग घेतला. अगदी सुरूवातीला मुलाणींच्या बरोबर एच. एम. व्ही. च्या जी. एन. जोशी यांच्या घरी जाण्याचा योग आला. 'हा प्रयत्न मी १९५० च्या सुमारास करून बघितला होता. पण त्यावेळी त्याला थंड प्रतिसाद मिळाला. तुम्ही मंडळी योग्य वेळी हे काम हाती घेताय. माझ्या शुभेच्छा.' असं म्हणाले. आशिर्वादपर पत्र तर पाठवलंच पण त्यांच्या व्यक्तिगत संग्रहातल्या रेकॉर्डस पण त्यांनी दिल्या. त्यावेळी त्यांचं वय बरंच झालं होतं व हालचालींवर बंधनं पण आली होती. त्यामुळं इच्छा असूनही त्यांना बोलावून त्यांच्याच गाण्याच्या रेकॉर्डस ऐकविण्याचा कार्यक्रम होऊ शकला नाही. तो योग २००९ साली त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं आला. पुणे व मुंबईत दोन श्रवणसत्रं झाली. जी. एन. जोशी हे भावगीत गायकांच्या पहिल्या पिढीतले गायक. शंभराचे वर गाणी त्यांनी मुद्रित केली आहेत. पुढं ग्रामोफोन कंपनीतले अधिकारी या नात्याने त्यांनी अनेक नामवंतांची मुद्रणं केली व या क्षेत्रात अनेक अभिनव प्रयोग केले. त्यांचे समकालीन भावगीतगायक जनार्दन लक्ष्मण तथा जे. एल. रानडे यांना मात्र आम्ही एका कार्यक्रमात बोलावलं. वयाच्या ९२

व्या वर्षी तरूणाच्या उत्साहानं ते सहभागी झाले व जुन्या काळात रंगून गेले. सुधीर फडके व स्नेहल भाटकरांनी पण त्यांच्या एच. एम. व्ही च्या दिवसांतल्या आठवणी यानिमित्तानं जागवल्या.

याच सुमारास दूरदर्शनवरून 'सुरभि' हा अतिशय लोकप्रिय कार्यक्रम सादर होत असे. त्याचे निर्माते सिद्धार्थ काक यांच्या 'गाता जाये बंजारा' या चार भागातल्या दूरदर्शनपटाच्या निमित्तानं त्यांचा परिचय झाला होताच. पुढं त्यांनी सोसायटीच्या उपक्रमावर पाचेक मिनिटांचा सुंदर कार्यक्रम केला व ग्रामोफोन रेकॉर्डसवर आधारित 'सवाल-जवाब' मला बनवायला सांगितला. अगदी पहिल्या जमान्यातल्या ग्रामोफोन सिंगर्स मध्ये 'प्यारासाहिब' नावाच्या पुरूष गायकाचा आवाज अगदी बायकी होता. त्यामुळे त्याच्या व 'कलकत्तेवाली गौहरजान'च्या आवाजातलं एकेक गाणं ऐकवून यातला पुरूष आवाज कोणाचा ते ओळखायला सांगितलं होतं. त्या सवाल जवाबाचे विजेते होते नडियादचे प्रो. शरदभाई मेहता. त्यांनी माझा पत्ता हुडकून काढला व मुंबईत येऊन भेटले व आमचेच झाले. त्यांनी तर पुढं पदरमोड करून जुन्या जमान्यातल्या गायक गायिकांवर पंचवीसेक अभ्यासपूर्ण व्याख्यानं सोसायटी करिता दिली. पं. राम नारायण त्यांच्या सारंगी वादनाच्या सुरूवातीच्या ७८ गतीच्या ध्वनिमुद्रिका शोधत होते. माझ्याकडं आहेत समजल्यावर घरी ऐकायला आले. एका श्रवणसत्रात सहभागी होऊन त्यांनीही त्या काळच्या आठवणी जागवल्या. आणखी एका सुरेख कार्यक्रमात विख्यात शायर व गीतकार मजरूह सुलतानपुरी सामील झाले होते. त्यांच्या आठवणीत न राहिलेली पण त्यांनी लिहिलेली गाणी ऐकून चकित झाले होते. हया सर्व कार्यक्रमांची ध्वनिमुद्रणं म्हणजे आमची 'मर्मबंधातली ठेव' आहेत.

दरम्यान दिल्ली दूरदर्शननं आमच्या कामाची दखल घेऊन अर्ध्या तासाचा कार्यक्रम सादर केला. त्यामुळं संपूर्ण देशभरातून अनेक नादलुब्धांशी, संग्राहकांशी व अभ्यासकांशी गाठ पडली व त्यातले काही आमच्या उपक्रमांशी जोडले गेले. १९९२-९३ च्या आसपास प्रभाकर दातारांच्याबरोबर दक्षिण मुंबईतल्या एन. सी. पी. ए. परिसरात 'वाडिया लायब्ररी ऑफ म्युजिक' मध्ये गेलो होतो. त्यावेळी पु. ल. देशपांडे तिथं संचालक होते व संशोधन विभागात डॉ. अशोक रानडे. अतिशय दर्जेदार कार्यक्रम तिथं सादर होत असत. वीसेक हजार ध्वनिमुद्रिकांची तिथं साठवण केलेली होती. आमच्या या नवीन धडपडीचं दोघांनीही स्वागत केलं व संपूर्ण सहकार्य करायचं आश्वासन दिलं. पुढं डॉ. रानडे तर आमच्यात सामीलच झाले व 'ध्वनिमुद्रित संगीता'वरची वेगवेगळया विषयांवरची अनेक व्याख्यानं त्यांनी दिली.

डरम्यान दर शुक्रवारी मुंबईच्या चोरबाजारात संग्राहकांची चक्कर होतच असे. कारण अजूनही तुरळक का होईना तिथं जुन्या ध्वनिमुद्रिका मिळत असत. रेकॉर्डस बरोबर नवीन नादिष्टांच्या ओळखी पण होत. सलीमभाई, हुसेनीभाई, जमालभाई यांच्यासारखी व्यापारी मंडळी आमच्यापैकी अनेकांना चांगलीच ओळखू लागली व आमच्याकरिता रेकॉर्डस व कॅटलॉगज बाजूला काढून ठेवू लागली होती. असाच एकदा बाजारात फिरत असताना लेंगा शर्ट घातलेला एक वयस्कर गृहस्थ एका विक्रेत्याशी हुज्जत घालत असलेला दिसला. गेल्या शुक्रवारी खरेदी करून नेलेल्या रेकॉर्डस न आवडल्यामुळे परत करावयास आला होता व निम्मे पैसे परत मागत होता. जरा चौकशी

केली तर गेली तीस वर्षे हा गृहस्थ बाजारात येतो आहे व जुने प्लेयर्स दुरूस्त करण्यात वाकबगार आहे असं समजलं. परिचय करून घेतला तर बी. सोभराज वासवानी असं नाव समजलं. त्यानं उल्हासनगरला घरी बोलावलं. मग एकदा बरीच मित्रमंडळी मिळून गेलो. सगळं घर ग्रामोफोनस व तबकडयांनी भरलेलं. जुन्या व्हॉल्व्हचा रेडिओ वापरून त्यावर गाणी ऐकण्यातली मजा काही औरच होती. बैठकीच्या खोलीत एक ७८ गतीची रेकॉर्ड भिंतीवर खिळयाला लटकावून ठेवलेली व 'हयाच्या खाचांतूनच अस्सल भारतीय संगीत ऐकायला मिळतं' असा मजकूर इंग्रजीतून वाचायला मिळाला. घराच्या मागच्या बाजूला फोनो मशीन्स दुरूस्तीचं छोटंसं वर्क शॉप. वासवानी इथं एकटेच राहतात. कुटुंब व मुलं मुंबईत. अधूनमधून येतात. हा माणूस मात्र जुन्या जमान्यातच रमलेला. डोळयात मोतीबिंदू झाला तरी कामाचा उरक व उत्साह मात्र दांडगा. कितीतरी लोकांनी त्यांच्याकडून फोनो दुरूस्त करून नेले आहेत. फारसं औपचारिक शिक्षण झालं नसतांना केवळ पुस्तकं वाचून व अनुभवाच्या बळावर अफाट काम त्यांनी केलं. ७५ वर्षे होऊन गेली. तरी सी. डी. प्लेयर दुरूस्त करायला शिकायची तयारी आहे. त्यावरच्या आवश्यक पुस्तकांची मागणी प्रत्येक भेटीत होत असते. उल्हासनगरचे प्रीतमकुमार मेंघाणी महंमद रफीच्या गीतांचा कोष बनवीत होते. त्या निमित्ताने त्यांच्याशी परिचय झाला. कितीतरी विविध विषयांवरच्या अनमोल वस्तूंचा खजिनाच त्यांनी जमा केलाय. ग्रामोफोनस व रेकॉर्डस हा त्यांचाही वीक पॉइंट व अभ्यासकांच्या मदतीला सदैव तैयार असा हा अनोखा संग्राहक.

मुंबईतलं काम हळूहळू रसिकांच्या नजरेला पडून पसंतीला उतरत होतं. वर्तमानपत्रातल्या बातम्या व लेखांमुळं इतरत्रही जात होतं. 'दि रेकॉर्ड न्यूज' हया इंग्रजीतल्या मुखपत्रामुळं देशविदेशातही जाऊ लागलं होतं. त्यामुळं मैत्रीच्या कक्षा आणखीनच विस्तारू लागल्या. बाहेरगावाहूनही चौकशी होऊ लागली. परिणामी अनेक ठिकाणी सोसायटीच्या स्वायत्त शाखांचं काम सुरू झालं. त्यातून मद्रासचे व्ही. ए. के. रंगाराव, सोलापूरचे मोहन सोहोनी, जयंत व निखिल राळेरासकर, अशोक थोवडे, तुळजापूरचे सुधीर पेशवे, अमरावतीचे अरविंद हंबर्डे, नांदेडचे प्रभूराज कुलकर्णी, प्र. तु. शास्त्री सर व मधुकर धर्मापुरीकर, बडोद्याचे नरेंद्र कमल श्रीमाली, इंदूरचे सुमन चौरासिया, जयपूरचे विजय वर्मा, कानपूरचे हरमंदर सिंग हमराज, कलकत्त्याचे रांतीदेब मोइत्रा, सुशांतकुमार चतर्जी, सरजलाल मुखर्जी (हरूबाबू), स्नेहाशीष चतर्जी, अरूणाभ घोष व राजीव गोएंका यांच्याशी स्नेहसंबंध जुळून आले. परदेशी मंडळींमध्ये पॅरिसचे आंद्रे ब्रुनेल, इंग्लंडचे सारंगीवादक निकोलस मॅग्रियल व डिस्कोग्राफर फ्रॅंक ॲन्ड्रयूज, कॅनडाचे जॉन कंपाना, रेग्युला कुरेशी व एरिक पार्कर, अमेरिकेतले जेम्स नाय, सुरजित सिंग व रॉबर्ट मिलीस, जर्मनीचे रैनर लोटझ, हॉलंडचे यूप बोर, ऑस्ट्रेलियाचे रॉस लेयर्ड व सिंगापूरचे प्रो. राजीव पतके यांचा समावेश आहे.

नादलुब्धांच्या या आगळया वेगळया मैत्री पार्क मध्ये विविध क्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी सामील आहेत. नवीन येत राहणारच आहेत. १९९१ पासूनचे 'दि रेकॉर्ड न्यूज' चे सर्व अंक आता दोन डी. व्ही. डी. वर उपलब्ध आहेत. भविष्यात नेटवरपण झळकणार आहेत. सिंगापूर विद्यापीठातून प्रो. राजीव पतके त्यांच्या वेब साईटवरून

शास्त्रीय संगीतातल्या शंभरेक गायक/गायिकांच्या ७८ गतीच्या ध्वनिमुद्रिकांची शास्त्रशुद्ध सूची व माहिती दिली आहे. 'अंडरस्कोअर रेकॉर्डस'च्या लेबलवर जुन्या ध्वनिमुद्रिका पुन्हा एकदा सी.डी.वर रसिकांपुढं आणायचं मोठंच काम शुभा मुदगल व अनीष प्रधान या सोसायटीच्या आजीव सभासदांनी गेल्या काही वर्षांपासून हाती घेतलेलं आहे. 'लिव्हिंग म्युझिक फ्रॉम दि पास्ट' या मालिकेत 'केसरबाई केरकर' 'माधवराव वालावलकर' व 'जी.एम.लोंढे' हया तीन सी.डी.वितरित झाल्या आहेत. गेल्या काही वर्षात अनेक संग्राहकांच्या घरातच संगणक विराजमान झाले आहेत. त्यामुळे आपापले संग्रह आता डिजिटल माध्यमात रूपांतरित करणं हा आता बोटांचा खेळ झाला आहे. त्यात अनेकजण गुंतले आहेत. आधुनिक तंत्रात जुन्याचं जतन करत असतांना नवे मैत्री बंध ई मेलस, नेट ब्लॉग्ज, फेस बुक्स यातून सतत फुलत राहोत हीच अपेक्षा व सदिच्छा.

डॉ. सुरेश चांदवणकर

२० सप्टेंबर २००९. chandvankar.suresh@gmail.com